दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २३७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी ई-पेपर

दैनिक रायगड नगरी वृत्तपत्र डिजिटल स्वरुपात देखील सुरु झाले असून आता आपण www.raigadnagari.com या वेबसाईट वर जाऊन ई-पेपर वाचू शकता, तर वाट कसली पाहताय! पनवेल तसेच नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण बातम्यांसाठी आपण रोजच्या रोज भेट द्या आमच्या वेब साईट आणि त्यावरील ई-पेपरला!

राज्य सरकार मुंबई-दिल्ली रेल्वे, विमानसेवा थांबविण्याची शक्यता!

दै.रायगड नगरी । मुंबई

दिल्लीत करोना संसर्गाची दुसरी लाट धडकल्याने एकच खळबळ उडाली आहे. दिल्लीतील स्थिती दिवसेंदिवस अधिकच नाजूक होत चालली आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकार सतर्क झालं असून दिल्लीशी तूर्त संपर्क तोडण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले जाण्याची शक्यता आहे.

मुंबईने करोनाचा क्रूर चेहरा पाहिलेला आहे. मुंबई देशातील करोनाचा सर्वात मोठा हॉटस्पॉट ठरला होता. हे संकट हळूहळू दूर होत असताना व स्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आली असताना दिल्लीत आलेल्या करोनाच्या दुसऱ्या लाटेने मुंबईकरांचीही धाकधूक वाढली आहे. त्यात आधीच दिवाळीनंतर दुसऱ्या लाटेचीही शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. त्यामुळे मुंबईतील करोनाची दुसरी संभाव्य लाट रोखण्यासाठी वेळीच पावले उचलली जात आहेत. त्यातूनच दिल्ली-मुंबई प्रवास तूर्त बंद केला जाण्याचे संकेत मिळू लागले आहेत.

दिली -मुंबई विमानसेवा आणि रेल्वेसेवा पुढचे काही दिवस बंद ठेवण्याचा विचार राज्य सरकार करत आहे. याबाबत राज्याचे मुख्य सचिव संजयकुमार यांनी माहिती दिली आहे. करोना

संसर्गाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून दिल्ली-मुंबई विमानसेवा तसेच रेल्वेसेवा बंद ठेवता येईल का, याबाबत राज्य सरकार विचार करत आहे. तसा प्रस्तावही असून तूर्त त्यावर केवळ चर्चा सुरू आहे. यात राज्य सरकारसोबतच रेल्वे, नागरी उड्डाण विभाग यांचीही परवानगी आवश्यक असल्याने संबंधितांशी चर्चा झाल्यानंतरच अंतिम निर्णय होणार आहे, असेही संजयकुमार यांनी स्पष्ट केले.

दिल्लीत करोना नियंत्रणात आल्यानंतर २८ ऑक्टोबरपासून अचानक स्थिती बदलली आहे. २८ ऑक्टोबर रोजी दिल्लीत दैनंदिन करोनारुग्णांची संख्या ५ हजारावर जाऊन पोहचली. त्यानंतर त्यात सातत्याने वाढ होत असून ११ नोव्हेंबर रोजी ८ हजार ५०० इतकी विक्रमी रुग्णसंख्या नोंदवली गेली. काल दिवसभरात दिल्लीत ७ हजार ५४६ नवीन रुग्णांची भर पडली. त्यामुळे दिल्लीतील एकूण रुग्णसंख्या ५ लाख १० हजार ६३० वर पोहचली आहे. आरोग्य विभागाच्या मते काल ६ हजार ६८५ रुग्ण बरे होऊन घरी परतले असून आतापर्यंत एकूण ४ लाख ५९ हजार ३६८ रुग्णांनी करोनावर मात केली आहे. दुसरीकडे दिवाळीनंतर मुंबईतील करोना बाधित रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. त्यामुळेच मुंबई पालिका प्रशासन आणि महाराष्ट्र सरकार वेळीच सावध होऊन पावले टाकताना दिसत आहे.

संक्षिप्त...

वाहतूक विभागाचा दंड भरा नाहीतर गाडी जप्त होईल

दै.रायगड नगरी । ठाणे

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दंडात्मक चलान फाडून वाहतूक पोलिसांनी या वर्षभरात जवळपास २२ कोटी रुपयांची चलान फाडले आहेत. त्यातही जवळपास १३ कोटी रुपयांची वसुली झाली नसून आता दंडाची प्रलंबित रक्कम भरण्यासाठी चालकांना दहा दिवसांची मुदत देण्यात आली आहे. दंड न भरल्यास १ डिसेंबरपासून विशेष मोहीम राबवून गाड्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. गाड्या ताब्यात घेण्यापासून ते गाडी परवाना निलंबनाचीही कारवाई करण्याचा इशारा वाहतूक शाखेचे उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी दिला आहे. आज पत्रकार परिषद घेऊन बाळासाहेब पाटील यांनी ही माहिती दिली. त्याचबरोबर पत्रिपूलाच्या गर्डर लॉन्चिंगसाठी चार दिवस घेण्यात येणाऱ्या मेगाब्लॉकमध्ये वाहतुकीचे नियमन करण्यात येणार असल्याचंही पाटील यांनी सांगितलं.

वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी कारवाईचा आकडा मोठा असला तरी दंडाची रक्कम वसूल होत नाही. कारण, वाहन चालक दंडच भरत नाहीत. थकीत रकमेचा आकडा मोठा असल्याचं निदर्शनास आलं. त्यामुळे दंडाची थकबाकी वसूल करण्यासाठी वाहतूक शाखेने प्रयत्न सुरु केले आहेत. येत्या दहा दिवसांमध्ये प्रलंबित असलेल्या ई चलानची रक्कम भरण्याची मुदत चालकांना देण्यात येत आहे. अन्यथा १ डिसेंबरनंतर दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. पाच हजार किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम प्रलंबित असलेल्या चालकांवर केसेस करण्यात येतील. ही कारवाई करत असताना मोटार वाहन कायदा कलम २०७ अन्वये गाडी ताब्यात घेतली जाऊ शकते. तसेच गाडी परवाना निलंबनाची कारवाई होईल.

सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थाकीय संचालकांची पंतप्रधान आवास योजनेंतर्गत महागृहनिर्माण योजनेच्या बांधकाम स्थळांना भेट

योजनेच्या पहिल्या टप्प्यातील घरांचा ताबा मार्च २०२१ अखेरपर्यंत देण्याचा सिडकोचा मानस

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

सिडकोतर्फे पंतप्रधान आ-वास योजनेंतर्गत नवी मुंबईमध्ये साकारण्यात येत असलेल्या महागृहनिर्माण योजनेतील वाशी ट्रक टर्मिनस, खारघर रेल्वे स्थानक, खारघर बस टर्मिनस, खारघर बस आगार, कळंबोली बस आगार, पनवेल आंतरराज्यीय बस स्थानक, नवीन पनवेल (प.) बस आगार, खारघर, सेक्टर-४३ आणि तळ-ोजा, सेक्टर-२१, २८, २९, ३१ व ३७ या बांधकाम स्थळांना भेट दिली. दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी उपरोक्त बांधकाम स्थळांना भेट देऊन बांधकाम कार्याचा आढावा घेतला. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यातील घरांचा ताबा मार्च २०२१ अखेरीस देण्याचा मानस असल्याचे व नव्या वर्षात सिडकोच्या घरांची विक्री करण्याच्या योजनादेखील जाहिर करण्याचा सिडकोचा मानस असल्याचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थपाकीय संचालक यांनी यावेळी स्पष्ट केले.

या प्रसंगी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांसमवेत के. एम. गोडबोले, मुख्य अभियंता (नवी मुंबई), श्री. संजय चोटालिया मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), सिडकोचे प्रकल्पाशी संबंधित अधिकारी, कंत्राटदार व सल्लागार देखील उपस्थित होते.

सिडकोतर्फे पंतप्रधान आ-वास योजनेंतर्गत नवी मुंबईमध्ये साकारण्यात येत असलेल्या महागृहनिर्माण योजनेतील घरांच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर असून

या योजनेमुळे नजीकच्या काळात अनेक कुटुंबांचे हक्काच्या घराचे आणि नवी मुंबईमध्ये वास्तव्य करण्याचे स्वप्न साकार होणार आहे, असे उद्गार या भेटीदरम्यान डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी काढले. सिडकोने नेहमीच अत्यंत किफायतशीर दरात घरांची विक्री केली आहे. त्यामुळे सदर महागृहनिर्माण योजनेच्या माध्यमातून सिडको प्रधानमंत्री आ-वास योजनेतील सर्वांसाठी ..../२

मुंबई, ठाणे जिल्ह्यातल्या शाळाही ३१ डिसेंबरपर्यंत बंद

दै.रायगड नगरी । मुंबई

मुंबई पाठोपाठ ठाणे जिल्ह्यातल्या शाळादेखील ३१ डिसेंबरपर्यंत बंद राहणार आहेत. याबद्दलचे आदेश जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदेंनी जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांना दिले आहेत. मुंबई, ठाणे परिसरातील कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागल्यानं शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यात सहा मोठ्या महानगरपालिका आहेत. त्यात ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, भिवंडी, उल्हासनगर, मिरा-भाईंदर महापालिकांचा समावेश होतो. जिल्ह्यातल्या विद्यार्थ्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्यानं शाळा सुरू केल्यास विषाणूचा फैलाव अधिक वेगानं होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळेच ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदेंनी संपूर्ण जिल्ह्यातल्या शाळा ३१ डिसेंबरपर्यंत बंद ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

तत्पूर्वी आज सकाळी मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी शहरातील शाळा बंद ठेवण्याचे आदेश प्रशास-नाला दिले. मुंबईतल्या शाळा ३१ डिसेंबरपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.गेल्या काही दिवसांत मुंबईतील कोरोनाच्या रुग्णसंख्येत लक्षणीय घट झाली. मात्र दिवाळी आणि सणावारांच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या गर्दीमुळे कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे खबरदारीची बाब म्हणून मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इक्बाल ..../२

सोनसाखळी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांची टोळी अटक

२० गुन्ह्यातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश

दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार

पनवेल : सोन्याची साखळी चोरणाऱ्या तब्बल २० गुन्ह्यांमध्ये सक्रिय असणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या युनिट २ ला यश मिळाले आहे. नुकताच पदभार स्वीकारलेल्या पोलीस निरीक्षक गिरिधर गोरे यांनी कर्तव्यावर हजर झाल्यानंतर अवघ्या १० दिवसात एकूण तीन गुन्ह्यांची उकल केली. यामध्ये लुटमार, खूनासारख्या अती भयंकर आणि किचकट अशा गुन्ह्यांमध्ये आपले कौशल्य पणाला लावून आपल्या कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने ही कामगिरी केली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ०१ आणि परिमंडळ ०२ मधील विविध पोलीस ठाण्याच्या आवारात चैन स्क्याचींग सारखे प्रकार वारंवार घडत असल्याचे समोर येत होते. यापूर्वी फैयाज शेख या गुन्हेगाराला पोलिसांच्या धाडसी पथकाने अटक केली होती. त्यावेळी पोलिसांसोबत अग्निशस्त्रा द्वारे चकमक झाली होती. मात्र त्यावेळी पोलिसांनी ..../२

खांदा वसाहत परिसरातून ३ इसमांना अग्नीशस्त्रासह केले मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेने गजाआड

दै.रायगड नगरी । पनवेल

खांदा वसाहत परिसरातून तीन इसमांना अग्नीशस्त्रासह नवी मुंबई मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने गजआड केले असून त्यांच्याकडून जवळपास १ लाख ५ हजार ६०० रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत केला आहे.

बिपीनकुमार सिंह, पोलीस आयुकत, डॉ.जय जाधव, पोलीस सह आयुकत, नवी मुंबई, यांनी पनवेल परिसरातील नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये विनापरवाना बेकायदेशीर अग्नीशस्त्र जवळ बाळगणाऱ्या इसमां विरूध्द विशेष मोहीम राबवुन कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार नवी मुंबई गुन्हे शाखेचे अति.पोलीस आयुकत बी.जी. शेखर पाटील, पोलीस उप आयुकत प्रविणकुमार पाटील, सहा. पोलीस आयुक्त विनोद चव्हाण, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली विनापरव-ाना बेकायदेशीरपणे अग्निशस्त्र जवळ बाळगणाऱ्या इसमांवर काखाई करण्याची मोहीम सुरू केली. दरम्यान पोना/२१० किरण राउत, मध्यवर्ती कक्ष,

गुन्हेशाखा नवी मुंबई यांना मिळालेल्या खात्रिशिर बातमीवरून मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखेचे सपोनि एन.बी.तांबे व पथक यांनी खांदा वसाहत, से.नं.१३ रिध्दी कॉम्पलेक्स समोरील रोडवर ता. पनवेल जि.रायगड याठिकाणी सापळा लावुन इसम नामे अभिजीत संभाजी पवार वय २८ वर्षे धंदा नोकरी रा. ई-२०३, ओम शिवा कॉम्पलेक्स, .../२

पनवेलमध्ये ६४ शिक्षकांमध्ये १७ पॉझिटिव्ह ; दक्षता घेण्याचे आव्हान

दै.रायगड नगरी । कळंबोली

करोना महामारी ची टांगती तलवार प्रत्येकाच्या शिरावर असताना शासनाने शाळा सुरू करण्याचे फर्मान सोडले आहे. त्यासाठी शासनाने दिलेल्या आदेशानुसार पनवेलमध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकांची टेस्ट उपजिल्हा रुग्णालयात गुरुवारी करण्यात आली. ६४ शिक्षकांची टेस्ट करण्यात आली त्यामधून १७ शिक्षक कोरोना बाधित असल्याचे शुक्रवारी निष्पन्न झाल्याने पनवेलमध्ये एकच खळबळ उडाली आहे. शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे .जे शिक्षक करोना पॉझिटिव्ह आले आहेत त्यांनी व त्यांच्या प्रशासनाने वेळीच दखल घेऊन योग्य ती दक्षता घेऊन उपचार घेण्याचे आवाहन पनवेलचे गटशिक्षणाधिकारी नवनाथ साबळे यांनी केले असून शासन जो आदेश देईल तो शिरसावंद्य मानून काम करण्याचे आवाहनही केले आहे.

करोणा महामारी च्या नऊ महिन्याच्या संकटानंतर शासनाने नववी ते बारावी पर्यंतच्या शाळा २३ नोव्हेंबर पासून सुरु करण्याचे फर्मान सोडले आहे .यासाठी शाळेचे निर्जंतुकीकरण करणे, तसेच जे शिक्षक प्रत्यक्ष कार्यरत असणार आहेत त्यांची आर.टी.सी.पी.आर टेस्ट नजीकच्या शासनमान्य ओळख प्रयोग शाळेत करण्याचे आदेश सोडले आहेत पनवेलमधील ६४ शिक्षकांची आर टी सी टी आर टेस्ट पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये गुरुवारी करण्यात आली होती. यामधून १७ शिक्षक कर्मचारी हे पॉझिटिव्ह ..../२

काशिद समुद्रात बुडणाऱ्या चार जणांना जीवनदान

दै.रायगड नगरी । आगरदांडा

मुरुड तालुकयामधील काशीद हे आंतराष्ट्रीय पर्यटन स्थळ असून येथे अनेक देशी -विदेशी पर्यटकांचा वावर असतो. मुरुड समुद्र किनाऱ्यापेक्षा सर्वात जास्त व मोठ्या संख्येने पर्यटक काशीद समुद्र किनारी येत असतात.

पुणे औरंगाबाद येथून मोठ्या संख्येनं पर्यटक येत असतात व उत्साहापोटी समुद्रात पोहण्यास उतरतात व पाण्याचा अंदाज न आल्याने खोल समुद्रात खेचले जातात. आज ..../२

वाढीव वीज बिलांविरोधात वीज बिलांच्या प्रती जाळून केला निषेध

दै.रायगड नगरी । उरण

कोरोना काळात सर्वसामान्य नागरिकांना महाराष्ट्र शासना तर्फे अंदाजे वाढीव वीज बिल देण्यात आली होती ती वीज बिले अनेक तज्ञ व जनतेच्या मते चुकीची व अन्यायकारक होती. अनेक सामाजिक संघटनांनी व जनतेने तसेच भाजप, मनसे, शिवसेना, काँग्रेस या राजकीय पक्षांनीही राज्यात अनेक ठिकाणी या वाढीव वीज बिलांविरोधात शासकीय कार्यालयात जाऊन निवेदने दिली होती. आंदोलनही केले होते. मात्र वीजबिल माफ झाले नाही किंवा त्यात सर्वसामान्य गोरगरिबांना कोणतेही सूट मिळाली नाही मात्र आता वीजबिलात कोणतेही सूट मिळणार नाही. सर्व वीजबिल ग्राहकांना भरावे लागेल असे शासनातर्फे स्पष्ट करण्यात

आले आहे. या निर्णयाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना पसरली आहे.

जनतेच्या भावना व जनहिताचा विचार लक्षात घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेना उलवे शहर यांच्यावतीने MSEB ..../२

'पिंजऱ्यातल्या पोपटा'ची गोष्ट

केंद्रीय गुप्तचर विभाग म्हणजे सीबीआयच्या कामासंबंधी इ. स. २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. एम. लोढा यांनी 'हा तर पिंजऱ्यातला पोपट असून तो केवळ त्याच्या मालकाने शिकविलेली भाषाच बोलतो' असा तिखट शेरा मारला होता. केंद्रात कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी यात फरक पडत नाही आणि सीबीआयला आपल्या बदलत्या मालकांप्रमाणे आपला सूर आणि पट्टी बदलण्याची कलाही चांगलीच अवगत झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही निरीक्षणे नोंदविताना देशातील सुबुद्ध नागरिकांची भावनाच बोलून दाखवली होती, यात शंका नाही. मात्र, केंद्रीय गुप्तचर खात्याने हातात घेतलेल्या खटल्यांमधील जवळपास ७० टक्के प्रकरणांमध्ये आजवर शिक्षा झालेली आहे. कोणत्याही राज्यातील पोलिसांपेक्षा हे यशाचे प्रमाण कितीतरी जास्त आहे. त्यामुळेच, एखादे संशयास्पद प्रकरण गाजू लागले की, त्या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्याची मागणी होऊ लागते. अशी मागणी होणे, हा एका अर्थाने सीबीआयच्या विश्वासार्हतेचा पुरावा आहे. सीबीआयनेही देशभरात आजवर अशी अनेक अवघड आणि गुंतागुंतीची प्रकरणे धसास लावली आहेत. असे असूनही देशातील एका पाठोपाठ एक अशा आठ राज्यांनी सीबीआय तपासासाठी असणारी 'सर्वसाधारण परवानगी' काढून घेतली आहे आणि विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने राज्यांच्या या भूमिकेवर शिक्कामोर्तबच केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. भूषण गवई आणि न्या. अजय खानविलकर यांच्या खंडपीठाने भारताच्या संघराज्यीय रचनेकडे लक्ष वेधून असे म्हटले आहे की, कोणत्याही राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात सीबीआयला तपास करण्याची मुभा असली तरीदेखील राज्यांची यासाठी पूर्वानुमती घेण्याची आवश्यकता आहे. हा सारा विषय आंध्र प्रदेशाने काही वर्षांपूर्वी सीबीआयला राज्यात कोणत्याही प्रकरणाचा तपास करण्यासाठी असणारी 'सर्वसाधारण अनुमती' काढून घेतली, तेव्हा सुरू झाला. त्यानंतर क्रमाक्रमाने महाराष्ट्रासहित आजवर आठ राज्यांनी ही सर्वसाधारण अनुमती काढून घेतली आहे. आंध्रमध्ये मात्र जगनमोहन रेड्डी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी ही काढून घेतलेली अनुमती सीबीआयला दिली आहे. याचा अर्थ, सीबीआयला राज्यात तपासाची सर्वंकष अनुमती द्यायची की नाही, हा विषय आता प्रशासकीय किंवा न्यायिक राहिलेला नसून तो पक्षीय राजकारणाचा एक भाग झाला आहे. भारतासारख्या खंडप्राय आणि अंतर्गत सुरक्षाविषयक अनेक आव्हाने समोर असणाऱ्या देशात असे व्हायला नको होते. पण तसे ते झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने तर आता यावर शिक्कामोर्तबही केले आहे. या घटनाक्रमाचा सारा दोष देशातील राजकीय पक्षांकडे जातो. केंद्र सरकारांनी आणि तेथे राज्य करणाऱ्या पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी सीबीआयचा वापर केल्याचा आरोप जितका जुना आहे; तितकीच सीबीआच्या स्वायत्ततेची मागणीही जुनी आहे. इंदिरा गांधी यांचा १९७७ मध्ये पराभव झाला, तेव्हा सत्तेवर आलेल्या जनता पक्षाने सीबीआयला 'मुक्त आणि स्वायत्त' करण्याच्या बाता मारल्या होत्या. प्रत्यक्षात काहीही झाले नाही. सध्याचा सत्ताधारी भाजपने आजवर सीबीआय ही केंद्र सरकारच्या हातातले बाहुले बनल्याची टीका किती वेळा केली असेल, याची मोजदादही करता येणार नाही. मात्र, भाजपला सत्ता मिळाल्यानंतर गेल्या सहा वर्षांमध्ये सीबीआयला स्वायत्तता देण्याचा विषय भाजप पुरता विसरून गेला आहे. उलट, भाजप केंद्रात सत्तेत असताना आठ राज्यांनी 'आमच्या परवानगीशिवाय आमच्या राज्यात पाऊल टाकू नका' असे का बजावले असेल, याचे आत्मपरीक्षण केंद्र सरकारने करण्याची आवश्यकता आहे. राज्यांनी अशी अनुमती काढून घेणे, हा सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे भारताच्या संघराज्यीय रचनेचा जसा आविष्कार आहे; तसाच तो भारताच्या एकात्मिक रचेनवरचा ओरखडाही आहे, हे विसरता कामा नये. यापुढे, अनेक राज्यांचा संबंध असणारी संवेदनशील प्रकरणे सीबीआयकडे तपासासाठी येतील आणि त्यांच्या तपासासाठी विविध राज्यांच्या अनुमतीचा विषय न्यायालयांमध्ये जाईल, तेव्हा हा ओरखडा किती त्रासदायक आहे, हे सिद्ध होईल. या साऱ्यातून मार्ग काढणे, हे केंद्र सरकारच्या हातात होते. भारतीय जनता पक्षाची कृपा होऊन निवृत्तीनंतर राज्यसभेचे खासदार झालेले माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी बरोबर एक वर्षापूर्वी डी. पी. कोहली स्मृती व्याख्यानात 'केंद्र सरकारने सीबीआयचे अधिकार, कर्तव्ये आणि स्वायत्तता यांची परिसीमा ठरविण्यासाठी एक व्यापक कायदा करावा,' अशी सूचना केली होती. सीबीआयच्या कामात केवळ राजकीयच नव्हे तर प्रशासकीय हस्तक्षेपही होतो. इतकेच नाही तर, सीबीआयमधील नेमणुका, सीबीआयला दिली जाणारी संसाधने यांच्यावरही वेगवेगळ्या प्रकारे निर्बंध आणता येतात. सर्वोच्च न्यायालयाने ताजा निकाल देताना ज्या 'दिल्ली स्पेशल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'चा संदर्भ दिला आहे, तो कायदा स्वातंत्र्य मिळण्याआधीचा म्हणजे, १९४६ मधला आहे. सीबीआयला आज असणारे तपासाचे अधिकार हे या कायद्यातून येतात. केंद्र सरकारने नवा कायदा केला तर सीबीआयचे कार्यक्षेत्र निर्विवादपणे देशव्यापी करता येईलच. पण मग तसे करताना सीबीआयच्या स्वायत्ततेचा मुद्दाही येईल आणि त्याचा निकालही लावावाच लागेल. जोपर्यंत केंद्र सरकार सीबीआयच्या पाठिशी नव्या, व्यापक कायद्याचे पाठबळ उभे करीत नाही, तोवर अतिशय कार्यक्षम आणि तरीही राजकीय हस्तक्षेपामुळे बदनाम होत असणाऱ्या या संस्थेची ताकद वाढणार नाही. सीबीआयच्या अधिकारांच्या निमित्ताने अशी कज्जेदलाली होणे, हे नैतिक खच्चीकरण करणारे ठरू शकते, याचेही स्मरण केंद्र सरकारने ठेवायला हवे. 'राष्ट्रहित सर्वोपरी' असे नुसते म्हणून चालत नाही. तसे प्रत्येक बाबतीत वागावे लागते. सीबीआयला स्वायत्तता आणि व्यापक अधिकार देणे, हे राष्ट्रहिताचे महत्त्वाचे काम आहे. केंद्र सरकारने मनावर घेतले तरच ते होऊ शकते.

पालीत माकडे आणि वानरांचा उच्छाद ; उपद्रव व हल्ल्यांमुळे नागरिक हैराण

जीविताला धोका असल्याने माकडांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

प्रख्यात अष्टविनायक क्षेत्र असलेल्या पाली गावात माकड व वानरांनी उच्छाद घातला आहे. त्यांच्या उपद्रवामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. काही लोकांवर देखील या माकडांनी हल्ले करून जखमी केले आहे. त्यामुळे या वानर व माकडांचा कायम स्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी वनविभाग व तालुका प्रशासनाकडे विद्येश आचार्य यांनी निवेदनाद्वारे केली आहे. उपद्रवी माकडांचा लवकरात लवकर बंदोबस्त झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळेल असे मत स्थानिक रहिवाशी व्यक्त करत आहेत.

पाली मधील राम आळी, बाजारपेठ, देऊळवाडा, मधली आळी, खडकाळी, कासार आळी, सोनार आळी, आगर आळी, बेगरआळी, उंबरवाडी, सावंतआळी, अशा सर्वच गजबजलेल्या भागात माकडे आणि वानरे रोज धुमाकूळ घालत आहेत. मोठमोठी वानरे आणि माकडे छतावर उड्या मारून घराचे पत्रे व कौले फोडतात. तसेच ड्रेनेजचे पाईप, विजेच्या तारा, गच्चीत ठेवलेले सामान, पाण्याच्या टाक्या, झाडाच्या कुंड्या, झाडे यांचे अतोनात नुकसान करत आहेत. त्यांच्या या उपद्रवामुळे झाडे, फळे, फुले यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जिवितास देखील धोका निर्माण झालाय. बाहेर कोणत्याही गोष्टींचे वाळवण घालता येत नाही. इतकेच नव्हे तर घराची दारे, खिडक्या पण उघड्या ठेवणे अवघड झाले. घरात शिरून माकडे अन्नधान्य, भाजीपाला यांची नासाडी करत आहेत. वाळत घातलेले कपडे देखील फाडून टाकतात. यामुळे मोठी आर्थिक हानी होत आहे.



पनवेल तालुक्यातून इसम बेपत्ता

दै.रायगड नगरी । पनवेल

तालुक्यातील चेरिवली गावातील एक ५५ वर्षीय इसम सकाळच्या वेळेस कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

हरिश्चंद्र दामा कातकरी असे या इसमाचे नाव असून अंगाने मध्यम, उंची ५ फूट, रंग सावळा, चेहरा उभट, नाक लांब, डोळे काळे, केस काळे पांढरे व मध्यभागी टक्कल आहे. दाढी अर्धवट काळी व पांढरी वाढलेली. तसेच अंगात काळ्या रंगाची हाफ पॅन्ट आहे. त्याला मराठी व कातकरी भाषा अवगत आहे. तसेच दारु पिण्याचे व्यसन आहे.

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा
फोन नं. : 022-27469434 / 9619737911 / 9619979706
कार्यालय : १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, जुने रतन टॉकीज समोर टिळक रोड, पनवेल
Email : raigad.nagari@gmail.com

केंद्राने महाराष्ट्राची आर्थिक कोंडी करून जनतेची केली फसवणूक ; तरीही महाराष्ट्र सक्षमपणे उभा : खा.सुनील तटकरे

दै.रायगड नगरी । म्हसळा

स्वच्छ म्हसळा, निरोगी म्हसळा यानुसार घनकचरा निर्मूलन होण्याच्या दृष्टीने म्हसळा नगरपंचयातीस मिळालेल्या दोन घंटा गाड्यांचे उद्घाटन खास.सुनिल तटकरे यांच्या हस्ते आज दिनांक २० नोव्हेम्बर २०२० रोजी करण्यात आले.

या प्रसंगी नगराध्यक्षा जयश्री कापरे, उपनगराध्यक्ष सुहेब हालडे, सभापती उज्वला सावंत, उपसभापती मधू गायकर, रा.जि. प.चे कृषी सभापती बबन मनवे, प्रदेश चिटणीस अलिशेठ कौचाली, माजी सभापती छाया म्हात्रे, पं. स.सदस्य संदिप चाचले, तहसीलदार शरद गोसावी आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मार्गदर्शन करताना खास.सुनिल तटकरे यांनी सांगितले की मध्यंतरीच्या काळात मी स्वतः कोरोना बाधित होतोय महिनाभरच्या काळात मी लवकरात लवकर यातून बरा व्हावा या साठी अनेकांनी आपापल्या परीने माझ्यासाठी प्रार्थना केल्या त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी असून असेच प्रेम तटकरे कुटुंबियांवर ठेवण्याचे आवाहन केले. त्यांनी पुढे सांगितले की स्वच्छ आणि सुंदर म्हसळा यासाठी मी पाहिलेल्या स्वप्नांची पूर्तता माझ्या कडून होत असताना मी अत्यंत समाधानी आणि आनंदी असल्याचे सांगितले.

म्हसळा शहराला गेली कित्येक वर्षे भेडसावणारा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न येत्या महिनाभरात पूर्णपणे सुटेल असे सांगून लोणेरे ते म्हसळा आणि म्हसळा ते हरिहरेश्वर हा अतिशय चांगल्या प्रतीचा रस्त्याचे रुंदीकरणासह काम येत्या पंधरा दिवसाच्या कालावधीत सुरु होत असून काही अंतर्गत रस्ते,मुख्य प्रशासकीय इमारत,सुसज्य भाजी मार्केट,मच्छी मार्केट आणि शहराच्या विकासाची सर्व कामे टप्प्याटप्याने मंजूर करून ती पुढील कालावधीत पूर्ण करण्याचा मानस त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

कळसूबाई शिखर मोहीमेत मिलिंद जाधव सन्मानित

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

२६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनाच्या औचीत्याने सोलापूरमधील '३६० एक्सप्लोरर' या संस्थेच्या वतीने महाराष्ट्राच्या सर्वात उंच कळसूबाई शिखराची मोहीम आयोजित केली होती. यात गडदुर्गांच्या वेगवेगळ्या मोहीमेत सहभाग घेणारे रायगड जिल्ह्याच्या श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतनचे दुर्गप्रेमी मिलिंद मधुकर जाधव यांची हाय रेंज बुक आफ वर्ल्ड रेकॉर्डमधे नोंद झाल्याने भारत सरकारची मान्यता असलेलं आणि अमेरिकेने (णड-) प्रमाणित केलेलं विशेष सन्मानपत्र आणि पदक देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आल्याचे तसेच कोरोना टाळेबंदीमुळे पदक आणि सन्मानपत्र मिळण्यासाठी सात महीन्यांचा अवधी लागल्याची माहिती त्यांनी दिली आहे. या मोहिमेत महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या सुमारे साठ लोकांच्या उपस्थितीत शिखराच्या सर्वोच्च माथ्यावर भारतीय राज्य घटनेचं सामुहिक वाचन करण्याचा एक अनोखा उपक्रम देखिल संपन्न झाला. जगातले सर्वोच्च शिखरं सर करणारे आनंद बनसोडे आणि लातूर येथील आंतरराष्ट्रीय धावपटू ओमकार स्वामी यांचा सहभाग हे या सोहळ्याचं ठळक वैशिष्ट्य होतं. ज्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो त्यांचा हाय रेंज पर्सन असा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. हा मानाचा पुरस्कार प्राप्त दुर्गप्रेमी मिलिंद जाधव यांचे समाजाच्या सर्व स्तरातुन विशेष कौतुक होत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

महागृहनिर्माण योजनेच्या बांधकाम स्थळांना भेट

घरे या उद्दिष्टपूर्तीसाठी मोठे योगदान देणार असल्याचे मतही उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी यावेळी व्यक्त केले. त्याचप्रमाणे सदर गृहप्रकल्प हे परिवहन केंद्रीत असल्याने नागरिकांचा घर ते कामाचे स्थळ यातील प्रवासाचा वेळ वाचणार आहे.

सिडकोतर्फे डिसेंबर, २०१८ मध्ये 'परिवहन केंद्रीत विकास' संकल्पनेवर आधारित महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला होता. या गृहनिर्माण योजने अंतर्गत नवी मुंबईतील तळोजा नोड्सह विविध नोड्समधील बस डेपो, ट्रक टर्मिनस, रेल्वे स्थानक फोरकोर्ट एरिया परिसरामध्ये घरांचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर गृहनिर्माण योजना ही एकूण ४ पॅकेजमध्ये साकारण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांकरिता घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या सर्व बांधकाम स्थळांना भेट देऊन उपाध्यक्ष तथा व्यवस्थाकीय संचालक, सिडको यांनी संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना देऊन मार्गदर्शन केले.

मुंबई, ठाणे जिल्ह्यातल्या शाळाही ३१ डिसेंबरपर्यंत बंद

सिंह चहल यांनी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळा ३१ दिवसांपर्यंत बंद ठेवण्याची घषोणा केली आहे. तसेच २३ नोव्हेंबरपासून सुरू होणारे ९ ते १२वीचे वर्गही सुरू न करण्याचे आदेशा पालिका आयुक्तांनी दिले आहे.

सराईत गुन्हेगारांची टोळी अटक

प्रसंगावधान राखून फैयाज याला अटक केली होती. किरकोळ गुन्हे जरी वाटत असले तरी या गुन्हेगारांची हिम्मत कोणत्याही थराला जात असते.

नवी मुंबई परिसरातील सोनसाखळी चोरांना पकडल्यानंतर त्यांच्याकडून नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून अधिक चौकशी करण्यात आल्यानंतर तब्बल २० गुन्ह्यांची कबुली त्यांनी दिली आहे. यावेळी त्यांच्याकडून २ मोटार सायकल आणि ३८ तोळे सोने असे एकूण २० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आज रोजी एका भरगच्च पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांनी ही माहिती पत्रकारांना दिली. यावेळी त्यांच्यासमवेत अप्पर पोलीस आयुक्त बी.जे.शेखर पाटील, पोलीस उपायुक्त गुन्हे प्रवीण पाटील, सपो.आ.विनोद चव्हाण, पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे तसेच युनिट क्र.२ चे कर्मचारी व या गुन्ह्याचे पो.हवा.साळुंखे यांच्या खास खबऱ्याकडून माहिती मिळाल्याने हा गुन्हा त्यांच्या सहकाऱ्यांच्यामार्फत उघडकीस येण्यास मोलाचे काम ठरले आहे.

यामध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये तन्वीर मोहम्मद इब्राहिम शेख ऊर्फ दीपक, अखिल शरीफ खान, तरशरुफ ब्रैद्दुर रहमान शेख, सर्व रा.मानखुर्द, मुंबई, शबनम शब्बीर शेख आणि हरून लाला सय्यद दोघेही रा.पनवेल अशी असून त्यांच्यावर भा.दं.वि.कलम ३९२, ४११, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकामध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गिरिधर गोरे यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी केलेल्या या कामगिरीचे पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंग यांनी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये कौतुक केले आहे.

अग्नीशस्त्रासह केले मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेने गजाआड

सुकापुर ता.पनवेल जि.रायगड मुळ रा.वरूडेवाफ गाव ता, राजगुरूनगर जि.पुणे, कासिम अब्दुल कलाम वय ३८ वर्षे धंदा स्वयंपाकी रा.ए-वन बिर्याणी दुकान,३ टाईप,बांठीया शाळेजवळ नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड मुळ रा. रा.नरहरगौडा, पो.लखानोवडी, ता.महशी जि.बैरईच राज्य उत्तर प्रदेश यांना अक्टीव्हा ४जी क्र. एमएच ४६/बीएफ/६०६३ या गाडीसह ताब्यात घेतले सदर दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अभिजीत संभाजी पवार यांचे जवळ विनापरवाना बेकायदेशिर देशी बनावटीचे पिस्टल आणि २ जीवंत काडतुसे मिळुन आले. सदर इमसाकडे कसुन तपास केला असता त्यांनी अग्निशस्त्र हे रोहित मनोहर पवार वय २५ वर्षे धंदा नोकरी रा.एच-२०२ ओम शिवा कॉम्पलेक्स, सुकापुर ता.पनवेल जि.रायगड यांच्याकडुन घेतल्याचे सांगितल्याने रोहित पवार यास मध्यवर्ती कक्ष गुन्हेशाखा येथे आणुन नमुद गुन्हयाचे अनुशंगाने तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने नमुद तीन्ही इसमां विरुध्द खांदेश्वर पोलीस ठाणे येथे भारतीय शस्त्र अधिनियमचे कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ३७(१),१३७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद गुन्हयामध्ये त्यांना अटक करण्यात आलेली आहे. सदर तीन्ही आरोपीच्या ताब्यातुन देशी बनावटीचे पिस्टल, २ जिवंत काडतुसे, ऑक्टीव्हा ४ जी वाहन,रोख रक्कम व इतर साहित्य असे एकुण १,०५,६००/- एकुण किंमतीचा मुद्देमाल पंचनामा करून ताब्यात घेण्यात आला आहे. सदर इसमाकडे त्यांनी अग्निशस्त्र कोणाकडुन घेतले अगर यापुर्वी देखील अश्याप्रकारचे किती अग्निशस्त्र विकत घेवुन कोणाला दिले आहे अगर कसे? तसेच यामध्ये आणखी किती लोकांचा सहभाग आहे याचा पुढील तपास सपोनि/ तांबे, मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखा हे करत आहे. सदरची उल्लेखनीय. कामगिरी नवी मुंबई गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्षाचे वपोनि,एन.बी. कोल्हटकर,सहा. पोलीस निरीक्षक, निलेश तांबे, पोहवा/नितीन जगताप, पोहवा/शशिकांत शेंडगे, पोना/किरण राउत, पोना/सचिन धनवटे, पोना/सचिन टिके, पोशि/रूपेश कोळी यांनी, केलेली. आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा हे करीत आहेत.

पनवेलमध्ये ६४ शिक्षकांमध्ये १७ पॉझिटिव्ह

असल्याचे त्यांच्या आलेल्या अहवालानुसार निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पनवेलमध्ये एकच खळबळ उडाली असून शुक्रवारी पुन्हा १०५ शिक्षकांची टेस्ट करण्यात आली आहे. त्यांचा अहवाल शनिवारी प्राप्त होणार आहे. त्यामध्ये किती शिक्षक बाधित असतील याचा नेम नाही. ६४ शिक्षकांमधून १७ शिक्षक जर पॉझिटिव येत असतील तर ते असणारे प्रमाणही रौद्र रूप धारण करणार असल्याचे मत काही शिक्षकांनी वर्तविली आहे. शासन शाळा सुरू करण्याची घाई करीत आहे असा प्रतिसवाल ही काही शिक्षक कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. आरटीसीपी आर टेस्ट करण्यामध्येही शासनाच्या वतीने पूर्ण सावळागोंधळ होत असून ज्या शाळांमध्ये शिक्षक संख्या जास्त आहे त्या शाळांमध्येच टेस्ट करणारी यंत्रणा का जात नाही असा सवालही केला जात आहे. सद्यस्थितीत ६४ शिक्षकांमधून १७ शिक्षक हे बाधित निघाल्याने त्यांच्यावर वेळीच उपचार होणे गरजेचे आहे .याकरिता जे शिक्षक ज्या शाळांमधील आहेत त्या शाळा व संस्थेच्या प्रशासनाने याबाबत तातडीने दखल घेऊन संबंधित पॉझिटिव्ह असलेल्या शिक्षकांना योग्य ते सूचना व मार्गदर्शन करून उपचार घेण्याचे आवाहन पनवेलचे गटशिक्षणाधिकारी नवनाथ साबळे यांनी केले आहे .पनवेलमधील अद्याप शेकडो शिक्षकांची करोणा टेस्ट करणे बाकी आहे. त्यामध्ये किती शिक्षक बाधीत निघतील याचा अंदाज लावणे दुरापास्त झाल्याने शिक्षक वर्गांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे वर्ग मध्ये सुद्धा हे चिंतेचे वातावरण आहे. शासन एकीकडे कोरणा काळात शाळा सुरू करणे बंधनकारक नसल्याचे सांगत असून दुसरीकडे मात्र शाळाही भरवा ऑनलाईनही काम करा असे सांगत असल्याने द्विधा मनस्थितीत शिक्षक व पालक वर्ग आहे .आपल्या पाल्याला शाळेत पाठवायचा की नाही या संभ्रमावस्थेत पालकही असून तो चिंतेत अडकला आहे. शासनाने जोपर्यंत उपायोजना करणारी लस उपलब्ध होत नाही तोपर्यंत शाळा सुरू करू नयेत, ऑनलाइन प्रक्रियेमधून शिक्षण सुरू आहे त्या पद्धतीनुसारच शालेय कामकाज सुरू ठेवण्याचे मागणी काही पालक वर्गाने केली आहे.

काशिद समुद्रात बुडणाऱ्या चार जणांना जीवनदान

सकाळीच पुणे येथील काही युवक पुण्याहून पर्यटनासाठी काशिद-बिचवर आले होते. काशीद येथील सुरुच्या वनात फिरता फिरता त्यांना समुद्रात पोहण्याचा मोह झाला.समुद्रात पोहण्यासाठी उतरलेले चार जण पोहता पोहता खोल समुद्रात खेचले गेले व पाण्यात गटांगळ्या खाऊ लागले. तेथे उपस्थित जीवरक्षक याना सदरची बाब निदर्शनास आली. त्यांनी तातडीने त्यांना पाण्यातून बाहेर काढण्यासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मोठ्या साहसाने पाण्यात उड्या घेतल्या. चार युवकांना समुद्रात पोहताना बुडत असताना वाचविण्यात रोहन खोपकर,वॉटर स्पोर्टस व एडव्हेचर्स चे लाईफगार्ड भावेश भोईर व संजय वाघमारे यांना मोठे यश प्राप्त झाले आहे. पुण्यातील पिंपरी चिंचवड टी.टी.एस.या नामांकित कंपनीतील इंजिनियर्स असलेले सत्यम कुमार (वय २१),सुमित बोरकर(वय२०),अनिरुद्ध गायकवाड(वय २०)नीरज कुमार(वय २४),पिरिसिल्ला गुप्ता(वय२१) व स्वाती लोणकर(वय १९) पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी काशिद बिचवर आले होते. यावेळी सत्यम कुमार, सुमित बोरकर, अनिरुद्ध गायकवाड व नीरज कुमार यांना समुद्रात पोहण्याचा मोह अनावर झाल्याने समुद्रात पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडू लागले. त्यांचे ओरडणे ऐकून लगेचच रोहन खोपकर वॉटर स्पोर्टस व एडव्हेंचर्सचे लाईफगार्ड यांनी स्पीड बोटीच्या सहाय्याने चार युवकांचे प्राण वाचविले. त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

वीज बिलांच्या प्रती जाळून केला निषेध

कार्यालय उलवे शहर येथे सरकारच्या वाढीव वीज बिलांच्या निर्णयाला विरोध करत वाढीव विज बिलांच्या प्रती जाळण्यात आल्या. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी सरकारच्या विरोधात घोषणा दिल्या. सोमवार पर्यंत वाढीव वीज बिलांविरोधात राज्य सरकारने समाधानकारक निर्णय न घेतल्यास आम्ही सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाप्रमाणे मनसे स्टाईलने योग्य ते पाऊले उचलणार आहोत असे महाराष्ट्र नवनिर्माण सेना उलवे शहराच्या कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले. तसेच यामुळे होणाऱ्या परिणामांची संपुर्ण जबाबदारी राज्य सरकारची असेल असा इशारा उलवे मनसे शहरच्या वतीने सरकारला देण्यात आला आहे. मनसेच्या वतीने निर्दोष गोंधळी (पनवेल ता.उपाध्यक्ष), श्रीमत घरत आणि आकाश देशमुख (उलवे शहर उपाध्यक्ष), अनिकेत ठाकुर (सरचिटणीस - उलवे शहर), मनोज कोळी (सचिव - उलवे शहर), प्रितम तांडेल (गव्हाण विभाग उपाध्यक्ष), कल्पेश कोळी(वहाळ पं. स अध्यक्ष) आदी मनसे कार्यकर्त्यांनी सरकारच्या विरोधात आपला निषेध नोंदवला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

आदिवासी वाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

दै.रायगड नगरी । पनवेल

नव संकल्प सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने नेरेपाडा येथील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे सदस्य प्रणित अहिरेकर, बाळाराम रोडपालकर, आकाश घाडगे, मयुरेश चव्हाण, उमेश बागल, अजित भैरवकर, अक्षता म्हामुणकर, चेतन पाटील, प्रमोद यादव, साहेब देशमुख, प्रतिक खामकर, सहभागी झाले होते.

अपंग क्रांती संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष बाळाराम रोडपालकर यांच्या माध्यमातून नव संकल्प सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने नेरेपाडा आदिवासी वाडीतील पन्नास विद्यार्थ्यांना शाळेची बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, अंकलिपी वितरित करण्यात आले. कोरोनाच्या संकटामुळे जगभरातील सर्व स्तरातील नागरिक प्रचंड मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहे. या आर्थिक संकटामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे एक हाथ शैक्षणिक मदतीचा संकल्प घेऊन नव संकल्प या सामाजिक संस्थेने हे वाटप केले. भारताचे उज्वल भविष्य शिक्षणातूनच साध्य होऊ शकते म्हणूनच शैक्षणिक दिवाळी हा उपक्रम संस्थेने हाती घेतला असल्याचे मत अध्यक्ष सागर जगताप यांनी व्यक्त केले. प्रत्येक वर्षी संस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रम राबवण्यात येतील असे सचिव राजेश गावडे यांनी यावेळी सांगितले.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

सिडकोची ई-प्रशासनाच्या दिशेने वेगाने वाटचाल

भारतात माहिती तंत्रज्ञान आणि डिजीटल क्षेत्रांतील क्रांतीनंतर ई-प्रशासन (E-Governance) या संकल्पनेचा उदय झाला. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिक व अन्य लाभार्थी घटकांना शासनाशी संबंधित धोरणे, योजना, प्रकल्प आणि सेवांचा थेट, विनाविलंब आणि अधिक पारदर्शक, सुलभ व कार्यक्षमरीत्या लाभ मिळावा हे ई-प्रशासन संकल्पनेमध्ये अभिप्रेत आहे. सुलभ प्रशासनाचे (Good Governance) उद्दिष्ट गाठणे, हा ई-प्रशासन संकल्पना राबविण्यामागील प्रमुख हेतू आहे. ई-प्रशासनामध्ये विविध सेवा या ऑनलाइन डिजीटल स्वरूपामध्ये देणे व त्यासाठी संगणक, इंटरनेट, ई-मेल, मोबाइल या माध्यमांचा वापर करणे अंतर्भूत आहे.

सिडको महामंडळानेही काळाची पावले ओळखून टप्प्या टप्प्याने आपल्या विविध सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देत ई-प्रशासनाच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू केली आहे. वसाहत विभागाच्या विविध सेवा, बांधकाम परवाने, ना-हरकत प्रमाणपत्रे, शुल्क/देयक भरणा, गृहनिर्माण योजनांशी संबंधित प्रक्रिया इ. सेवा सिडकोने पूर्णत: ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरिकांचांही या ऑनलाइन सेवांना उत्तम प्रतिसाद लाभत आहे. सिडकोच्या काही ऑनलाइन सेवांचा घेतलेला हा आढावा.

सॅप (SAP) प्रणालीचा अवलंब

सिडकोच्या विविध विभागांच्या कार्यप्रक्रियांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी सन २०१५ मध्ये सिडकोमध्ये सॅप प्रणालीचा अवलंब करण्यास सुरूवात झाली. सिडको प्रशासनाशी संबंधित विविध प्रक्रिया या अधिक सुसूत्रपणे व सुलभरीत्या पार पाडता याव्यात याकरिता या प्रणालीमध्ये फायनान्स, मटेरिअल मॅनेजमेन्ट, ह्युमन कॅपिटल मॅनेजमेन्ट, प्रोजेक्ट सिस्टीम्स, रिअल इस्टेट, कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेन्ट या विविध मॉड्यूल्सचा (विभाग) विशिष्ट उद्देशांकरिता समावेश करण्यात आला आहे. तसेच सिडकोच्या विविध विभागांतर्फे देण्यात येणाऱ्या ऑनलाइन सेवांचे सॅप प्रणालीशी एकत्रीकरण करण्यात आले आहे. प्रोजेक्ट सिस्टीममुळे सिडकोकरिता काम करणाऱ्या विक्रेत्यांची (Vendors) माहिती एकत्रितरीत्या जमा करणे, विक्रेत्यांतर्फे सादर करण्यात येणारी देयके व सिडकोतर्फे विक्रेत्यांना देण्यात येणारे शुल्क या गोष्टी ऑनलाइन करणे शक्य झाले आहे. ह्युमन कॅपिटल मॅनेजमेन्ट मोड्युलमुळे कर्मचाऱ्यांची माहिती, कर्मचारी वेतन, रजेकरिता ऑनलाइन अर्ज करणे, बायोमेट्रिक हजेरी या मनुष्यबळ व्यवस्थापनाशी संबंधित बाबी पार पाडणे अधिक सुलभ झाले आहे. रिअल इस्टेट मोड्युलमुळे वसाहत विभागाशी संबंधित सेवांकरिता अर्ज करणे, शुल्क भरणा, ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे या प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पाडल्या जात असल्याने नागरिकांचा वेळ आणि श्रम यांमध्ये बचत होते. तसेच भूखंड वा सदनिकेशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती केवळ एका क्लिकवर मिळणे शक्य होते. फायनान्स मोड्युल अंतर्गत विविध सेवांकरिता ऑनलाइन शुल्क भरणा व पावती प्राप्त करणे, गृहनिर्माण योजनांकरिता भरावयाच्या हफ्ते, जीएसटी, विलंब शुल्क यांची अचूक गणना करणे शक्य झाले आहे. सॅप प्रणालीमुळे सिडकोच्या विविध विभागांमध्ये अधिक चांगल्याप्रकारे समन्वय साधला जाऊन निर्णय प्रक्रिया जलद गतीने पार पडल्याने विविध सेवा या नागरिकांना अधिक जलद, कार्यक्षम व पारदर्शकरीत्या मिळण्यास मदत झाली आहे.

गृहनिर्माण योजना ऑनलाइन प्रक्रिया

मागील काही वर्षांपासून सिडको गृहनिर्माण योजनांशी संबंधित सर्व प्रक्रिया या ऑनलाइन पद्धतीने पार पाडण्यात येत आहेत. यामध्ये अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, स्कॅन केलेली कागदपत्रे अपलोड करणे, संगणकीय सोडत व यशस्वी अर्जदारांना वाटपपत्रे प्रदान करणे अशा विविध प्रक्रिया या ऑनलाइन पद्धतीने पार पाडल्या जातात. या सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी cidco lottery हे मोबाइल ॲपही विकसित करण्यात आले आहे. गृहनिर्माण योजनेशी संबंधित अद्ययावत माहिती (Updates) अर्जदारांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर किंवा ई-मेल आयडीवर पाठविण्यात येते. तसेच संगणकीय सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांतर्फे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करण्यासाठी सिडकोतर्फे 'निवारा' www.cidco.nivarakendra.in हे पोस्ट लॉटरी संकेतस्थळही विकसित करण्यात आले आहे.

सिडको महामंडळाच्या वसाहत विभागातर्फे देण्यात येणाऱ्या सर्व सेवा या दि. ०१ नोव्हेंबर, २०१९ पासून केवळ ऑनलाइन पद्धतीने पुरविण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. वसाहत विभागाच्या सेवांचे सुलभीकरण (इज ऑफ डुइंग बिझनेस) करण्याच्या उद्देशाने सदर निर्णय घेण्यात आला आहे. सिडकोच्या https://cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर ऑनलाइन सेवांकरिता अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यापूर्वीच वसाहत विभागाशी संबंधि विविध सेवा जसे, 'तारण ना-हरकत प्रमाणपत्र' प्राप्त करणे, कायदेशीर वारस हस्तांतरण, विविध प्रकारच्या परवानग्या प्राप्त करणे इ. सेवांचे सुलभीकरण करण्याच्या उद्देशाने या सेवांशी संबंधित प्रक्रियांचा आढावा घेऊन सिडकोने ऑनलाइन शुल्क भरणा सुविधा, सादर कराव्या लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करणे, अर्जदारांना स्कॅन केलेली कागदपत्रे सादर करण्याची मुभा

देणे, नागरिकांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहन देणे, डिजिटल स्वाक्षरी असलेल्या परवानग्या/ना-हरकत प्रमाणपत्रे ऑनलाइन पाठवणे इ. निर्णय घेतले होते. परंतु बहुतांशी सेवा ऑनलाइन केल्यानंतरही सिडकोच्या नोड्ल कार्यालयांमधील नागरिक सुविधा केंद्रांवर (CFCs) ऑफलाइन अर्ज सादर करण्याचा पर्याय ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आला होता.

वसाहत विभागाशी संबंधित विविध सेवा या ऑनलाइन पद्धतीनेच पुरविण्यात याव्यात व त्यासाठी अर्जदारांना वारंवार सिडको कार्यालयामध्ये येण्याची गरज भासू नये, या उद्देशाने दि. ०१ नोव्हेंबर, २०१९ पासून सर्व नागरिक सुविधा केंद्रे बंद करण्यात आली असून यापुढे आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह केवळ ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच वसाहत विभागाशी संबंधित परवानग्या/ना-हरकत प्रमाणपत्रेही अर्जदारांच्या ई-मेल आयडीवरच पाठविण्यात येणार आहेत. वसाहत विभागाच्या सेवा ऑनलाइन करण्यात आल्यामुळे अर्जदार नागरिकांच्या वेळेत बचत होण्यासह संबंधित सेवा त्यांना अधिक पारदर्शक, सुलभ व जलद पद्धतीने मिळणार आहेत.

वसाहत विभागाच्या ऑनलाइन सेवांना नागरिकांचाही उत्तम प्रतिसाद मिळून आतापर्यंत विविध सेवांसाठी ७,८५४ अर्ज प्राप्त झाले असून त्यांपैकी ६,२०६ अर्जांवरील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे तर १,६४८ अर्जांवर प्रक्रिया सुरू आहे. तसेच आतापर्यंत २,१६८ अर्जदार नागरिकांना परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्रे, आदेश ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत.

ऑनलाइन आरटीआय पोर्टल

ऑनलाइन आरटीआय पोर्टलमुळे माहिती अधिकारा अंतर्गत अर्ज करणे व त्यासाठीचे विहित शुल्क भरणे, आपल्या अर्जाची स्थिती तपासणे ही प्रक्रिया जलद बनली आहे.

ऑनलाइन तक्रार निवारण

ऑनलाइन तक्रार निवारण प्रणालीमुळे नागरिकांना घरबसल्या तक्रारी नोंदवणे व त्यांनी केलेल्या तक्रार अर्जाची स्थिती तपासणे तर अधिकाऱ्यांना विभागनिहाय तक्रारींची दखल घेऊन त्यांचे जलद गतीने निराकरण करणे शक्य झाले आहे.

ऑनलाइन पेमेन्ट गेटवे

ऑनलाइन पेमेन्ट गेटवे सुविधेमुळे अनामत रक्कम, सेवा शुल्क, पाणी देयके, सेवा शुल्क, वसाहत विभागाच्या सेवांकरिता भरावे लागणारे शुल्क ऑनलाइन भरणे शक्य झाले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक मे.श्री.ओम एन्टरप्राय्झेस तर्फे भागीदार श्री.दिनेश देवशी भाई पटेल यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे : शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड

गट नं व उपविभाग	क्षेत्र आर.चौ.मी.	आकार रु.पै.
४८	३०.००.००	३००.००

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१९/११/२०२०

सही/-
ॲड.भूषण मोरेश्वर म्हात्रे
१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९८९२२२२२५७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.पांडुरंग शंकर खंडाकळे खालील वर्णनाची सदनिका त्यांचे विद्यमान मालक मयत श्री.हिरालाल केशरचंद बांठीया व मयत श्रीम. सुजाता हिरालाल बांठीया यांचे वारस १) सौ.नम्रता धनंजय कुमट, २) सौ.विनया शैलेश मुथ्था, ३) सौ.ममता नरेश ककारिया, ४) सौ.समता प्रवीण सोनिग्रा यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

सदनिका क्र.००३, साई सिद्धी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं.५७, मिडल क्लास सोसायटी, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ४२० चौरस फूट कारपेट.

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा, कब्जा, वहिवाट, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.२०/११/२०२०
ठिकाण : पनवेल

सही/-
ॲड.अदिती पांडुरंग खंडाकळे
नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ऑफिस क्र.२२, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल, जि.रायगड
मो.नं.९६१९६९३६७१

श्री.बहिर सो.
वकील : तानाजी दादाराव येडके

जाहीर नोटीस

वारसाच्या सर्टिफिकेटबद्दल पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) पनवेल यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.४८५/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२०

श्री.नारायण अनंता पाटील
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.फ्लॅट नं.०२, आशिर्वाद अपार्टमेंट,
प्लॉट नं.१४४, पायणोर हॉस्पिटल जवळ,
मु.पो.न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार हे वरील अर्जामध्ये नमूद पत्यावर वास्तव्य करत आहेत. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार यांचे आजोबा मयत कै.सोंग्या महादू शेळके होते. तसेच अर्जदार यांची आजी मयत कै.जानकीबाई सोंग्या शेळके, आई मयत कै.अनुबाई अनंता पाटील व वडिल मयत कै.अनंता मंगळ्या पाटील हेही मयत झालेले आहेत. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, मयत कै.सोंग्या महादू शेळके यांचे दि.३०/१०/१९८९ रोजी मु.आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले. मयत कै. जानकीबाई सोंग्या शेळके यांचे दि.२०/०३/१९९० रोजी मु.आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले व मयत कै.अनुबाई अनंता पाटील यांचे दि.१८/०७/२०१३ रोजी मु.टेंभोडे, पो.कळंबोली, जि.रायगड येथे निधन झाले. मयत कै.अनंता मंगळ्या पाटील यांचे दि.३१/०५/२०१८ रोजी मु.टेंभोडे, पो.कळंबोली, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी कोर्टास सदरहू मयत व्यक्ती कै.सोंग्या महादू शेळके यांचे वारस घोषित करून मिळणेकामी अर्ज केला आहे. त्याच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

सर्व्हे/गट नं.८७, हिस्सा नं.२, क्षेत्र ०-१५-२ हे.आर., आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील मे.न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/११/२०२० रोजी आमच्या सहीने व कोर्टाचया शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मुजावर सो.
ॲड.प्रशांत अशोक भुजबळ

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.५१९/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२०

श्री.सुभाष नारायण नाईक
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
रा.कोल्ही, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.बाबीबाई नारायण नाईक यांचे निधन दि.०३/०७/२०२० रोजी झालेले आहे. कै.बाबीबाई नारायण नाईक यांचे पती कै.नारायण परशुराम नाईक यांचे निधन दि.०६/०५/१९८२ रोजी झालेले आहे. श्री.सुभाष नारायण नाईक ह्यांनी कै.बाबीबाई नारायण नाईक यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मौजे : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड

युनिट केस नं.	बांधकाम क्र.	बांधकामाचा वापर	बांधकामाचे क्षेत्र
KOL-ICOGS-131	KL-123,124	निवासी	११८.७७ चौ.मी.

वरील संपादीत मिळकतीपोटी पुनर्वसन व पुर्नस्थापना योजनेंतर्गत सिडकोकडून कै.बाबीबाई नारायण नाईक यांना मौजे : पुष्पक (वडघर), ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.२९६, सेक्टर नं.आर ३, क्षेत्र ३६० चौ.मी. हा भूखंड दि.११/०५/२०१८ रोजीच्या नोंदणीकृत भाडेपट्टा करारद्वारे वितरित करण्यात आलेला आहे. श्री.सुभाष नारायण नाईक हे कै.बाबीबाई नारायण नाईक यांचे कायदेशीर वारस आहेत, ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यायाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.सुभाष नारायण नाईक यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.बाबीबाई नारायण नाईक यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/११/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात

रे.मु.नं.१२/२०१७
नि.नं.३९/ड
ने.ता.४/१/२०२१

श्रीमती.मथुरा जयराम चिमणे वादी
विरुद्ध
श्री.नंदकुमार जयराम चिमणे वगैरे ६ प्रतिवादी
प्रति,
श्री.जयराम जानू चिमणे
वय : वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.जुई, पो.कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड

ज्याअर्थी वादींनी तुमच्याविरुद्ध हरविलेली व्यक्ती मयत असल्याचे घोषित करून मिळण्याकरिता न्यायालयात दावा दाखल केला आहे म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि.०४/०१/२०२१ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यांच्या योग्य सूचना दिलेल्या असून जे वादासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल असा सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्या बरोबर असेल अशा वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरलेल्या दिवशी वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे आमच्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीच्या व ज्या दस्तऐवजाचा आधार घेवून इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा जबाब रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि.११ माहे नोव्हेंबर सन २०२० रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

डॉ.गिरीश ठाकूरांसह वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जिल्हा रुग्णालयातील मानसोपचार विभागास दिली भेट

दै.रायगड नगरी । अलिबाग

येथील जिल्हा रुग्णालयातील मानसोपचार विभाग, ओपीडी येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबागचे अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर, जे.जे.रुग्णालय, मुंबई येथील एफ.एम.टी. विभागाचे विभागप्रमुख डॉ.चव्हाण आणि जी. टी. हॉस्पिटल,मुंबई चे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिनगारे यांनी भेट दिली.

यावेळी त्यांनी मानसोपचार विभागातर्फे करोना संकटकाळात आणि मानसिक आरोग्य सप्ताह दरम्यान घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती घेतली. कार्यक्रमांचे अहवाल पाहिल्यानंतर त्यांनी मानसोपचार विभागाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले व डॉ. गिरीश ठाकूर यांनी डॉ.अमोल भुसारे ,जिल्हा मानसोपचार तज्ञ यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री एकनाथ खडसे कोरोना पॉझिटिव्ह

जळगाव : वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री एकनाथ खडसे यांना कोरोनाची लागण झाली असून ते उपचारासाठी मुंबईकडे रवाना झाले आहेत. आपण मुंबईतील बॉम्बे रुग्णालयात उपचार घेणार आहोत, असे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे. यावेळी, माझ्या संपर्कात आलेल्या मंडळींनी कोरोना चाचणी करून घ्यावी, तसेच मी बरा होईपर्यंत कुणीही माझ्या भेटीसाठी येऊ नये, असे आवाहनही एकनाथ खडसे यांनी केले आहे.

यासंदर्भात, खडसे यांनी ट्विट करून सांगितले, की माझा कोरोना रिपोर्ट पॉझिटीव्ह आला आहे. गत ६ दिवसात माझ्या संपर्कात आलेल्या व्यक्तींनी स्वतः ची कोरोना चाचणी करून घ्यावी ही विनंती. पुढील उपचारासाठी मी मुंबईला रवाना होत आहे. तुम्हा सर्वांच्या सदिच्छा माझ्या सोबत असल्याने मी लवकरच बरा होऊन पुन्हा आपल्या सेवेत असेल.

कोरोनानंतर सुरु झालेल्या मॉल्सला अग्निशमन दलाची तंबी

दै.रायगड नगरी । मुंबई

कोरोनाला हरविण्यासाठी लागू करण्यात आलेले लॉकडाऊन आता शिथिल होत असून, मुंबई ब-यापैकी पूर्वपदावर येत आहे. मुंबईत पूर्व पदावर येत असतानाच मुंबईची मॉल संस्कृतीदेखील खुली झाली आहे. मात्र खुल्या झालेल्या मॉल्सने अग्नि सुरक्षा विषय नियमांचे पालन करावे. तसेच मॉल्समध्ये कोणत्याही प्रकाराचे अनधिकृत बांधकाम करू नये. आणि तसे केले असल्यास विभागीय सहाय्यक आयुक्तांना संबंधितांवर कारवाई करण्याचे अधिकार आहेत, असे म्हणत मुंबई अग्निशमन दलाने मुंबईतल्या मॉल्सला सूचनांचे, नियमांचे पालन करण्याच्या नोटीस धाडल्या आहेत.

मुंबई शहर आणि उपनगरातील मॉल आता खुले झाले असून, शहरासह उपनगरातील बहुतांश मॉलची तपासणी, पाहणी मुंबई अग्निशमन दलाकडून करण्यात आली आहे. आणि या मॉल्सला सुचनांचे पालन करण्याची नोटीस बजाविण्यात आले आहे. कारण आता कोरोनानंतर अनेक मॉल्स खुले झाले असून, येथे नियम पाळणे बंधनकारक आहे. अग्नि सुरक्षा महत्त्वाची आहे. नियम पाळले गेले नाहीत अथवा मॉलमध्ये अनधिकृत बांधकामे उभारले तर संबंधितांवर कारवाई करण्याचे अधिकार विभागीय सहाय्यक आयुक्तांना आहेत, अशी माहिती मुंबई अग्निशमन दलाचे प्रमुख शशिकांत काळे यांनी दिली. मुंबई अग्निशमन दलाने दिलेल्या यादीनुसार, ज्या मॉलची पाहणी करण्यात आली आहे त्या मॉलमध्ये सध्या तरी २९ मॉलचा समावेश आहे.

रेल्वेत नोकरी लावतो असे सांगून २२ पेक्षा अधिक बेरोजगार तरुणांची फसवणूक करणाऱ्यास अटक

दै.रायगड नगरी । पनवेल

सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रेल्वेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून २२ पेक्षा अधिक बेरोजगार तरुणांची फसवणूक करून त्यांच्याकडून रोख रक्कम घेवून गेल्या दोन वर्षापासून फरार झालेल्या आरोपीस आर्थिक गुन्हे शाखा कक्ष-२ च्या पथकाने गुजरात येथून अटक केली आहे.

याबाबत खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद कं. ३६९/ २०९८ भा.द.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६८, ३४ अन्वये दिनांक २६/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला-आहे. या गुन्हयातील पाहिजे आरोपी दिपककुमार जगदीशप्रसाद सिन्हा रा. बंगलो नं. ४३, तिर्थ रिट्रीट, कपोरीया नौकाडी, वडोदरा गुजरात यास अटक केली आहे.

आरोपी दिपककुमार जगदीशप्रसाद सिन्हा यांनी यातील फिर्यादी श्री मल्लप्पा करेप्पा मेटी वय ३० वर्षे यांना तो रेल्वे खात्यात नोकरी करीत असल्याचे खोटे सांगून त्यांना रेल्वेत तिकीट तपासणीस (टी.सी) या पदावर नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवुन त्यांना त्यांचे नावाने रेल्वेचे तिकीट तपासणीस पदाचे बनावट नियुक्ती पत्र व इतर बनावट कागदपत्रे देवुन त्यांची फसवणूक केलेली आहे. तसेच सदर आरोपीने फिर्यादी प्रमाणे इतर २२ पेक्षा जास्त पिडीतांकडून कडुन देखील अशाप्रकारे रेल्वेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून त्यांना तिकीट तपासणीस (टी.सी.), खलाशी इ. पदाचे बनावट नियुक्ती पत्र देवुन त्यांचेकडून एकूण रक्कम १,०३,७९,८००/- रू. स्विकारून त्यांची देखील फसवणुक केलेली एकुण रक्कम ल) आहे.

आरोपी दिपकुमार सिन्हा हा मागिल २ वर्षापासुन या प्रकरणापासून वाचण्यासाठी आपले अस्तित्व लपवून राहत होता. आरोपीचे 'ठावठिकाणाची माहीती काढुन त्यास अटक करणेकामी तपास पथक गुजरात राज्य येथे गेले असता आरोपीस पोलीस आल्याचा सुगावा लागल्याने तो पसार झाला होता. सदरचा आर-ोपी गुजरात येथे आल्याबाबत सपोनि मेखले व पथक यांना माहीती मिळताच पुन्हा ते गुजरात राज्य येथे जावुन सदर आरोपीचा शोध घेवुन अटक केली आहे. सदर आरोपीने गुजरात, झारखंड या राज्यातील व्यक्तींची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची कारवाई अपर पोलीस आयुक्त गुन्हे, डॉ. बी. जी. शेखर पाटील, पोलीस उप आयुक्त प्रविणकुमार पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २ यांनी अटक केली आहे. सदर आर-ोपीस आज दिनांक २०/११/२०२० रोजी मा. न्यायालयासमोर रिमांडकामी हजर करण्यात येत आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २ मार्फतीने चालू आहे. मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई श्री बिपिन कुमार सिंह यांनी सर्व सामान्य बेरोजगार सुशिक्षीत तरूणांना रेल्वेत नोकरीला लावून देणारी व्यक्ती / कंपनी / फर्म असल्यास त्याची शहानिशा व खात्री करण्याचे आवाहन केले आहे. नमुद आरोपीकडे रेल्वेत नोकरी लावून देण्यासाठी कोणी रक्कम दिली असल्यास त्यांनी आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २, नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री विजय वाघमारे व सपोनि कृष्णा मेखले यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

गरजेपोटी बांधलेल्या घरांचे भूसंपादनाचे शिक्के काढण्याची शिवसेनेची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

तालुक्यातील पडघे येथील शेतजमिनीवर गरजेपोटी बांधलेल्या घरांचे भूसंपादनाचे शिक्के काढावेत अशी मागणी विभाग प्रमुख विश्वास पेटकर यांनी शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

पडघे गावातील ७/१२ असलेल्या स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर सन १९७० साली भूसंपादन शिक्के मारलेले आहेत. परंतु त्या शेतजमिनींची कोणत्याही प्रकारची अवॉर्ड, सी.सी.कब्जेपावती बनलेली नाही. तसेच शेतकर्यांनी सिडकोकडून कोणत्याही प्रकारचा जमिनीचा मोबदला, १२.५% भूखंड दिलेला नाही.

या शेतजमिनीवर १९७० सालानंतर कुटुंबाच्या विस्तारानुसार शेतकर्यांनी ग्रामपंचायतीची रितसर परवानगी घेवून गरजेपोटी घरे बांधलेली आहेत. या जमिनीवर अर्धा पडघे वसलेले आहे.

तरी गरजेपोटी बांधलेल्या घरांचे भूसंपादनाचे शिक्के काढावेत अशी मागणी विश्वास पेटकर यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, मा.उपविभागप्रमुख हिरामण भोईर, शाखाप्रमुख काशिनाथ पाटील व शाखाप्रमुख मनोहर पाटील आदी उपस्थित होते.

म्हसळा पोस्ट कार्यालयातील आधार केंद्र सुरु करण्याची खा.सुनिल तटकरे यांचेकडे मागणी

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यात कुठेही आधार केंद्र सुरू नसल्याने तालुक्यातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून केवळ आधार कार्ड नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

नवीन आधार कार्ड काढणे, लिंक करणे, पॅन कार्ड काढणे अश्या अनेक महत्त्वाच्या कामांसाठी आधार कार्ड केंद्र म्हसळ्यात असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी तालुक्यातील नागरिकांना बोर्लीपंचतन, मोर्बा, माणगाव, लोणेरे इत्यादी ठिकाणी जावे लागत असल्याने आर्थिक, मानसिक आणि पर्यायाने शारीरिक त्रास सहन करावा लागतो आणि आधार केंद्रावर प्रचंड गर्दी असल्याने तासंतास रांगेत ताठकळत उपाशीतांन्ह उभे राहावे लागत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. म्हसळा पोस्ट कार्यालयात यापूर्वी कार्यरत असणारे आधारकार्ड केंद्र हेतुपुरस्सर बंद ठेवले गेले असून ५०/- रुपयात होणारे काम सातशे ते आठशे रुपये खर्चुनही वेळेवर होत नसल्याने तालुक्यातील एक तरुण समाजसेवक नदिम दळवी याने खास. सुनिल तटकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे दिले असून नागरिकांना न्याय देण्याची विनंती केली आहे.

केंद्राच्या व राज्याच्या योजना आणणार : खा.सुनील तटकरे

दै.रायगड नगरी । दांडगुरी

जनतेच्या बंधनामुळे मला ताकत मिळाली आहे. दुर्देवी महिन्या पूर्वी मला कोव्हिड ची बाधा झाली आज मी उभा आहे ते केवळ तुमच्या अशीर्वादामुळे, असे भावनिक उदगार रायगड चे खासदार सुनील तटकरे यांनी भरडखोल येथे काढले. कोळी समाजगृहाच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.कोव्हिड मधून बरे झाल्यानंतर खा तटकरे यांचा हा पहिलाच कार्यक्रम होता.लोकसभा खासदार वंदना चव्हाण यांच्या खासदार निधीतून हे कोळी समाजगृह बांधण्यात आले. त्याचे उद्घाटन खासदार तटकरे यांच्या हस्ते झाले. ते पुढे म्हणाले की, निसर्ग चक्रीवादळाने भुईसपाट झालेला माझा कोकणी माणूस नव्या उमेदीने उभा राहिला आहे.यापुढे राज्य सरकार व केंद्रसरकार कडून वेगवेळ्या योजना आणणार. मला फक्त विकास कामे करायची आहेत विकासाबाबती राजकारण मी कधीच करत नाही.माझा सर्वाधिक खासदार निधी जास्त श्रीवर्धन मतदार संघात खर्च केला जातो.मायबाप सरकारने आमचा दोन वर्षांचा निधी काढून घेतला असल्याने काही विकासाठी कमतरता करावी लागते.अजित दादाच्या मागे लागून सागरी महामार्ग पूर्ण झाल्यानंतर दोन - पाच वर्षांच्या कालावधीत या भागाचा मोठ्या प्रमाणात विकास होईल. काही मंडळींना कोव्हिड मधेच राजकारण करण्याची जास्त हाऊस आहे. छट पूजेला परवानगी दिली नाही म्हणून मुख्यमंत्री जातपतीच राजकारण करतेत हे बोलणं भाजपचे चुकीचे आहे.

कोव्हिडची दुसरी लाट पुन्हा येत असल्याचे निदर्शनास येत आहे. मी स्वतः या कोव्हिड मधून बाहेर आलो १५ दिवस एकटाच असल्याने संकट किती मोठा आहे, हे मी जवळून पहिले आहे

परंतु त्या १५ दिवसात सातत्याने या भागाची आठवण येत असत म्हणूनच मी विचार केला या कार्यक्रमाला जायाचं म्हणूनच या ठिकाणी आलो.

समाजासाठी काम करत असतांना सर्वांनी एकत्र येण गरजेचं आहे यावेळ व्यासपीठावर श्रीवर्धन मतदार संघाचे अध्यक्ष महमद भाई मेमन,नंदू भाई पाटील, सरपंच दिनेश चोगले,रामचंद्र वाघे,अध्यक्ष रामचंद्र पावशे, श्रीपाल कवाडे,संदीप भाऊ लाड, व आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघच्यावतीने २० वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा

राज्यातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

दै.रायगड नगरी । पनवेल

शैक्षिणक, सामाजिक, कला. क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २० वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली असून संपुर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धे च्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्यावतीने गेल्या १९ वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २० वी स्पर्धा आहे.

राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस ७५ हजार रुपये, व्दितीय क्रमाकांस ३५ हजार तर ततीय क्रमाकांस २० हजार रूपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कष्ट कथेसाठी ०७ हजार रूपये, उत्कष्ट कविता व उत्कष्ट व्यंगचित्रास प्रत्येकी २५०० रूपये, उत्कृष्ट विशेषांकास ०५ हजार रुपये, त्याचबरोबर बालसाहित्याच्या सवोत्कष्ट अंकास ७५०० रूपये व सन्मानचिन्ह तसेच रायगड जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ३० हजार रूपये, व्दितीय क्रमांकास १५ हजार रूपये आणि ततीय क्रमाकांस ७ हजार ५०० रूपये, दोन उत्तेजनार्थ क्रमांकास प्रत्येकी ०३ हजार व सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठया संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रूपये प्रवेश फीसह ३१ डिसेंबर २०२० पर्यत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. संपर्क क्रमांक ९७६९४०९१६१ यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

उरणच्या तरुणांनी रायगड किल्ल्याची बनविली हुबेहूब प्रतिकृती

दै.रायगड नगरी । उरण

उरण बोरी गावातील नव दुर्गा नवरात्रोत्सव व बोरी ग्रामस्थ यांच्यावतीने दरवर्षी किल्ले बनवा इतिहास जागवा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षीच्या स्पर्धेत बोरी गावातील ६ तरुणांनी एकत्रितपणे रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती बनविली आहे. ही प्रतिकृती बघितल्या नंतर साक्षात रायगड किल्ला असल्याचा भास निर्माण होतो.

या स्पर्धेत मुलांमध्ये किल्ल्यांविषयी व त्यांच्या इतिहासाविषयी माहिती व्हावी तसेच दिवाळीत मातीचे किल्ले बनविण्यासाठी बच्चे कंपनी पुढे यावीत या हेतूनेच नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ बोरी व बोरी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत बोरी गावातील कौस्तुभ मालुसरे, प्रथम मालुसरे, रुद्रा ठाकूर, विघ्नेश चव्हाण, अर्णव लोणारे व माही लोणारे या ६ तरुणांनी एकत्रितपणे रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती बनविली आहे.

या बनविलेल्या किल्ल्याचा फोटो पाहिल्यावर त्यामध्ये रायगड वरच्या वास्तू बांधल्या आहेत. त्यामध्ये राणी महल, परदेशी पाहुणे निवास, भवानी मंदिर, रायरेश्वर मंदिर, बाजारपेठ, मशिद, हत्ती तलाव, महादरवाजा, टकमक टोक, हिरकणी बुरुज, प्रवेश द्वार, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी अशा वास्तू बांधल्या आहेत

या बाबत कौस्तुभ दत्ता मालु-सरे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की रायगड किल्ल्याची प्रतिमा बनवण्यासाठी आम्हां ६ जणांना पंचवीस दिवस ला-गले, हा किल्ला बनविताना दगड लाल माती विटा आदींचा वापर करण्यात आल्याचे सांगितले. ही प्रतिकृती बघितल्यानंतर रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती असल्याचा भास निर्माण होतो.